डिसेंबर 2020.

चांगले काम ! गाओचे नोबेल भाषणही ग्रेट आहे ! पण इथे याचा काय उपयोग ? इथे, " साहित्यात राजकारण वर्ज्य नसते " असे म्हणत फक्त राजकारणावर बोलणारे लोक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होतात ! आणि त्या पदावरून ते भाषणही असे करतात की त्यांच्या विचाराचा कोणताही कार्यकर्ता ते भाषण मिळेल त्या प्रत्येक स्टेजवरून करत असतो ! गाओ ज्याला गंभीर साहित्य म्हणतो त्याची इथे गरजच नाहीय !

वा, माझ्यासारखे, त्या ' जुन्या ' म्हटल्या जाणाऱ्या सदानवीन गाण्यांचे चाहते आहेत जगात याचा आनंद वाटला !

अत्युत्तम, महत्त्वाची कॉमेंट -- सार्त्रच्या बाबतीत nothingness आणि choice एकत्र कसे येतात हे मला समजलेले नाही -- वरील विवेचनातले उद्देश्य आणि विधेय हेही कळलेले नाही --
नियती आणि स्वयंभू या शब्दांचे वेगवेगळे अर्थ घेऊन प्रत्येकाच्या बाजूने विचार करण्या एवढा विशाल दृष्टिकोण कल्पिणे हा एक भाग झाला. स्वयंभू म्हणजे दुसऱ्या कशाच्याही मदतीशिवाय वा पूर्वपीठिकेशिवाय निर्माण होणे. हा नाही, तो शब्द, हे ठीक. तसे काही असू नाही शकत, असे विज्ञान म्हणते. इथे निव्वळ वैज्ञानिक, बौद्धिक पद्धतीने या प्रश्नाकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. नियतीचे असंख्य अर्थ लक्षात घ्यायचे म्हटले तर ॲब्सर्डिटी अधिकाधिक धारदार होत जाईल ! यातून नेमके बौद्धिक प्रकारचे ' सत्य ' सापडू शकत नाही आणि तरीही माणूस हुशारी करत राहतो !
' स्वयंभू काहीच नसते ' हे माझे नव्हे तर वैज्ञानिक दृष्टिकोणाचे म्हणणे आहे. ज्यांना हे म्हटल्यावर राग येतो की विचारसरणी ही जनुकरचनेचा परिणाम असते, ते स्वतःला स्वयंभू समजत असतात, हा मथितार्थ. अशा प्रकारे जे पुरोगामी स्वतःला स्वयंभू समजत नाहीत त्यांच्याबद्दल ते विधान नाही. तसा त्याचा अर्थ होत असेल तर ते त्वरित मागे घेण्यात येईल.
प्रतिगामी, श्रद्धाळू, परंपरागत विचारवाले हे बरेचसे स्वतःला स्वयंभू मानतच नाहीत, त्यामुळे, त्यांचा विषय नाही.
पुरोगामीही स्वतःला या बिगरस्वयंभू चक्रातलेच मानत असतील तर पुरो आणि प्रती यांतले व्हॅल्यू जजमेंट -- मूल्यनिर्णयन नष्ट होते. अशा मूल्यनिर्णयनाशिवाय मग मानवी जगण्याचा विचार करावा लागेल. मी विचारस्वातंत्र्य हे मुळात विचार निर्माण होण्याचे स्वातंत्र्य म्हणूनच पाहतोय. बोलण्याचा भाग नंतरचा आहे. ते बोलणे, कृती करणे, अगदी मर्डरही करणे हे सगळे त्याच नियतीतून घडणार. पण मुळात स्वातंत्र्य कुठाय ? मी बोलावे की न बोलावे आणि मी बोललो तर तुम्ही सहिष्णुता बाळगावी की माझा मर्डर करावा, ही सगळीच नियती म्हटली की विचार आणि बोलणे सगळेच संपते -- असा हा प्रकार आहे ! टोटल ॲब्सर्डिटी !
विज्ञान कारण-परिणाम साखळी मानते !
2
तिला नियती म्हणता येईल का ? ती सृष्टीशी संबंधित आहे .
' नियती ' ही मानवी जीवनाशी निगडित आहे ना ? सर्व ' मानवीय ' निर्मिती
ही ' नियती ' मध्ये सामावते का ?
गौरी आहे ही माया . गौरी नाही ही देखील माया.
इथे धार्मिक कल्पना, श्रद्धा यांचे जंजाळ न आणताच बोलायचे, असा प्रयत्न आहे. त्यामुळे, मानवी जीवन ही काही निसर्गबाह्य गोष्ट आहे, असे समजायचेच नाही.

कोणता मेंदू कोणते विचार स्वीकारतो, हे कशामुळे ठरते ?
सगळे प्रभावयुक्तच असेल तर ' वास्तवाचे ज्ञान आणि भान ' म्हणजे काय ?
तुम्ही मेमरी म्हणजे स्मृतीचा खास उल्लेख करता -- सर्जकतेसाठी अमुक वैशिष्ट्यांची स्मृती चांगली, असे काही असते का ?ते मेटॅफिजिकलचे राहू द्या -- पण सर्जकता ही विशिष्ट प्रभावांचा परिणाम असते, असेच तुम्ही म्हणत आहात ना ?ठीक -- वर्गकलह असतो आणि कंडिशनिंग असते या दोन तत्त्वांवर आधारित तुमचे असे मत दिसते की सर्जकता ही प्रभावयुक्ततेतूनच येते आणि ती प्रभावयुक्ततेचा भागच असते. ठीक. आता उत्सुकता अशी आहे की कोणत्या प्रकारची प्रभावयुक्तता सर्जक असते ? ' सर्जक प्रभावयुक्तता ' असे काही असते का ?

मुलाखतीतल्या एका प्रश्नाला कौशिकीने दिलेले उत्तर --
Unusual? No, Kaushiki has enough reasons to feel that all this is very normal. Several serious classical musicians' popularity put them in the category of stars and they cultivated their image with studied care. After all, unlike their predecessors, musicians are very much seen these days. Beauty, both in aural and optical experiences, adds to the pleasure.
"I do enjoy the attention," admits a relaxed, casually dressed Kaushiki with disarming frankness. "I have seen iconic figures like Ustad Zakir Hussain handling all this with utmost ease. Pandit Ravi Shankar was very stylish. Shiv (Kumar Sharma) ji, Amjad (Ali) Khan sahib – all preserve their image very meticulously. Kishori (Amonkar)ji's carefully cultivated careless beauty and Lata (Mangeshkar)ji's white saris speak of tremendous style statements.
कौशिकीच्या मुलाखतीतली दोन वाक्ये -- " संगीत ही मानसिक स्थिती असते -- ती स्थिती जे व्यक्त करते तेच माझे संगीत असते -- "
" यमन तोच असतो पण कालचाच यमन आजही गायचा म्हणजे लोकांना शिळे अन्न वाढण्यासारखे आहे -- "

मराठीत निळूभाऊंच्या उंचीचा नट मी पाहिलेला नाही ! त्यांचा ' सखाराम बाइंडर ' हे अभिनयातले एक शिखर होते ! सुमारे ६८-६९ साली असेल, मी त्यांची एक प्रदीर्घ मुलाखत एका दिवाळी अंकासाठी घेतली होती.

पश्चिमी भाषांमधल्या कविता मराठीत आणण्याचे बऱ्यापैकी काम मी अलिकडेच केलेले आहे. यातले काही मुद्दे पटत नाहीत -- उदाहरणार्थ, विचार आधी येतो आणि मग भाषा येते, ही मांडणी. तसेच अनुवाद हा नेहमीच मूळ कलाकृतीपेक्षा ' कमीच ' असतो, हेही पटण्यासारखे नाही. अनुवाद हा अधिक चांगला आणि अधिक कसदारही असू शकतो.

अगदीच तसे नाही -- स्वत:च्या भ्रमांनी भारून न जाणे, हे आपले आपल्याला करावे लागेल, आपली कामचलाऊ फुटकळ मते बनवणे हे आपले आपल्यालाच करावे लागेल, आपली मते फुटकळ आहेत हे समजून राहणे हेही आपल्यालाच करावे लागेल ! या सगळ्या कर्तृत्वात अनंताचा काहीच रोल असणार नाही ! करेक्ट -- या पोस्टमध्ये कुठेही अनंत गृहीत नाहीय --तुकारामाने जसा अनंताचा उल्लेख केला तसेच हेही आले बघा वाचनात -- The fundamental principle of Buddhism is that the whole universe is in Limitless-Oneness, it is originally so, and

pure, i.e., free from artificial limits of concepts, values and judgments. म्हणजेच, एकच अनंतता ! तुकाराम आणि बुद्ध दोघेही भ्रमिष्ट होते असे आपले एकमत करून टाकू या !

तुमची कविता कधी आहे ते वास्तव पूर्णपणे उलगडते किंवा कधी खोटे वास्तव घडवून तिथून आहे त्या वास्तवावर प्रकाश टाकते ! मराठीत ही एक अद्वितीय नव्याच प्रक्रियेची कविता आहे ! ( लाख्यांची कविता. )

दुःखातून मुक्त असणे म्हणजेच निर्वाण म्हणजेच समग्र असणे म्हणजेच व्यक्तिगत मर्यादा नसणे.

Ravindra Damodar Lakhe
तुमच्या दिग्दर्शनात एक अपवादात्मक मर्मदृष्टी असते ! तुम्ही सादर केलेली माझी प्रत्येक संहिता -- " अरे वा, मी इतके चांगले लिहिलेय ! " असा आनंद मला देऊन गेली ! तुमचे दिग्दर्शनाबाबतचे चिंतन-पुस्तक मराठीत अद्वितीय ठरणार आहे यात शंकाच नाही !

नोव्हेंबर'20.
आपण सर्वांनी घडवलेल्या समाजाचा रेटा ' मद्दडपणातच जगले पाहिजे ' असाच आहे -- आपापल्या अनुभवक्षेत्रातून थोडेफार वैचारिक काही मांडले की बास, असा प्रकार -- ही कोंडी फोडायला बाहेरून कुणी येणार नाही -- आपल्यालाच त्याची तातडी वाटण्यावर ते ठरणार --

माझेही जीवनगाणे ' अकेला हूं मै ' हेच आहे !

" श्याम, असं घायकुतीला नाही येऊ बाळा -- जगभर सगळ्यांना राजकारणाचं भरीत आवडतं की नाही -- थांब, मी आज तुला वांग्याचं भरीत देते करून -- "

ऑक्टो ' 20 .
automatic poetry -- आपल्या विचाराचा ताबा पूर्ण सोडून देऊन कविता लिहिणे -- यात मनाच्या कुठल्याही भागातले काहीही येईल -- सलगता वा तर्क यांची फिकीर नसेल --

माझ्या लहानपणी ' ब्लॅक कॅट ' नावाचा हिंदी सिनेमा आला होता -- त्याचे पोस्टर सेम अशाच डोळ्यांचे होते !

मी ' आशय ' हा शब्द ' भान ' या अर्थी वापरलेला आहे. तो अनुभवाची वा मूळ भाषेची विशिष्टता ओलांडणारा आहे. त्यामुळेच त्याचे अपील आणि प्रस्तुतता सार्वत्रिक असते. वैशिष्ट्य-विविधता असूनही, मूळ कवितेच्या आधाराने वा निमित्ताने, ते भान अनुवाद भाषेत निर्माण होणे ही नवनिर्मितीच असते. फक्त दुःख, निराशा पोचवणारी कविता आणि त्या त्या अनुभवाचे भान पोचवणारी कविता यांत मूलभूत फरक आहे. अनुभव जसाच्या तसा या भाषेतून त्या भाषेत येणार नाही पण त्याचे समावेशक भान येऊ शकेल, असे म्हणायचे आहे.भान हे व्यक्तिगत अनुभव या रूपात नसते.' माणूस हा फक्त प्रतिक्रियेच्या अवस्थेतच असतो ' असा एखाद्याचा बौद्धिक निष्कर्ष असू शकतो. तिथे ही चर्चा संपुष्टात येऊ शकते. पण मग हेही पाहायला हवे की असा निष्कर्ष म्हणजे मूल्यात्मकता, संस्कृती यांच्या सर्व शक्यता संपवून टाकणे. कला म्हणजे फक्त एक करमणुकीचे वा पलायनाचे वा प्रचाराचे साधन -- असे मान्य करून थांबावे लागेल !व्यक्तिगत अनुभव या रूपात

नसलेले भान हेच समग्र भान कारण व्यक्तिगत प्रतिक्रियेतून ते बाहेर पडणे असते. जगातल्या अनेक कलावंतांनी हे म्हटलेले आहे. पण असे काही असू नाही शकत असा निष्कर्षच असेल तर बलात्कार, दहशतवाद, हिंसा, युद्धे हे सगळे समर्थनीय ठरेल. कुणा एकाच्या बुद्धीने प्रतिक्रियांचे मूल्यमापन होऊ शकणार नाही. आणि सर्व माणसे मौल्यवान प्रतिक्रिया देणारी होणे, ही अगदीच अशक्य कल्पना स्वप्न म्हणून स्वीकारावी लागेल !

भावविश्व हे पूर्ण मानवजातीचे एकच -- अनुभवविश्व प्रत्येकाचे वेगवेगळे असणार.तुम्ही अनुभवविश्वाला भावविश्व म्हणताय -- या पद्धतीने पाहिले तर जगातले कवी, नाटककार कुठे पोचणारच नाहीत ! पण, तसे होत नाही -- पोचतात -- जाने दो -- राहू द्यात मतभेद --

विचित्रपणा, ॲब्सर्डिटी, गंमत, कुरापत, गांभीर्य आणि चावटपणा अशी सगळी एकत्र भेळेची डिश करायची होती !

या चर्चेतच दडलेले आहे उत्तर -- ते असे --

भूमिका आणि शोध

लेखकांनो आणि कलावंतांनो
भूमिका घ्या थोर व्हायचे असेल तर
शोध घ्या कशाचा घेणार ते आधी ठरवावे लागेल का
याचा आधी शोध घ्या भूमिका नसणे हीही एक भूमिकाच
याचप्रमाणे भूमिका असणे म्हणजे भूमिका नसणेच
असे होईल का याचाही शोध घ्या आपल्या स्वभावाने
जे सापडेल त्याला शोध म्हणता येईल का
याचाही घ्या शोध आधी पोटाची सोय हीच खरी भूमिका
शोध घेता घेता भूमिका तयार होईलच राहू द्या शोध
नुसत्या दोन दिशा सुचवा शोधाच्या तेवढे पुरे
भूमिकेचा आणि वास्तवाचा संबंधच नसतो
हे कळून घ्यावा शोध भूमिका घेतल्यावर कला मरते
त्यापेक्षा शोध घेणे हीच एक भूमिका आहे
हे का नाही पाहात जाऊ द्या शोध थांबणार नाही
आणि भूमिका बदलत राहणार हे सत्यच पाहावे
आणि शोधाच्या अस्तराशिवाय भूमिका कसली
पण भूमिका राजकीय हवी की सामाजिक
की व्यक्तिगत की सर्वसमावेशक
ते ठरवायला नको का उगीचच शोध म्हणून
भूमिका धोपटण्यात काय अर्थ आहे
त्यापेक्षा यातले कळणाऱ्याचा घेऊ आधी शोध
तो म्हणेल त्या मार्गाने जाऊ अहो याच बाबतीत

तर आहेत ना शेकडो भूमिका
आणि आपण गुरुबाजी का स्वीकारावी
गरिबी विषमता जावी एवढे पाहा म्हणजे झाले
सर्वांच्याच हिताचा शोध शक्य आहे का त्याचाही शोध घ्यावा
--- ००० ---

मूळ शब्द nothingness -- रिकामीक हा शब्द तुकारामाचा आहे.

सप्टे ’20.
आमच्या ऑफिसात एक उत्तरप्रदेशी शिपाई होता, तो असा सारखा हसत असे. एकदा साहेबांनी त्याच्या एका चुकीबद्दल झापण्यासाठी त्याला केबिनमध्ये बोलावले, तर हा हसत आत गेला. साहेब चिडून काही बोलले. तरी हा हसत राहिला. " तुम्हे कुछ अकल है क्या, मै तुम्हें डांट रहा हूँ और तुम हस रहे हो ? " असे साहेब अधिकच चिडून म्हणाले तरी हा हसतच राहिला ! " तुम्हारा दिमाग खराब है क्या ? " साहेब म्हणाले, तरी हा हसतच राहिला ! पण, त्याने हसत उत्तर दिले, " क्या करूँ साब, हमे हसी आती ही रहती है ! " तो म्हणाला ! " अभी प्रोबेशन चालू है तुम्हारा, नौकरी मे रहना है या नही, सोच लो -- निकलो अब यहाँसे -- " साहेब म्हणाले ! त्यावर हसतच हा आनंदी माणूस बाहेर आला !

अलिकडेच 'आविष्कार ' ने मामांचे ' भूमिकन्या सीता ' हे नाटक रंगभूमीवर आणले होते -- नाटक आणि प्रयोग दोन्ही खूप आवडले होते !

त्या वेळी नोकरीनिमित्त मी आमच्या राहुरी फॅक्टरी शाखेला होतो. माझ्या सर्पभीतीची माझे सहकारी जरा गंमत करत. " तुम्ही कराल का साहेब असा कार्यक्रम -- बाहत्तर तास नको, एकच तास आणि शंभर विषारी सापही नकोत, एकच ? " असे एकाने मला विचारले. म्हटले, " मी असे छोटे चमत्कार नाही करत -- करायचे तर जंगीच करतो -- " " म्हणजे कसे ? " त्याने विचारले. " अरे, गेले सहा महिने मी तुम्हा सगळ्यांच्या सान्निध्यात नाही का काढून दाखवलेले ? ! " या माझ्या उत्तरावर माझ्यासह सगळे खुश !

माझ्या आयुष्यात विभूती एकच, म्हणजे मी सत्तेवर आलो तर एखाद्या विद्यापीठाला नक्कीच त्यांचे नाव देईन -- आदरणीय श्री. नीलीमकुमार खैरे ! शंभर विषारी सापांच्या सान्निध्यात बाहत्तर तास बसण्याचा चमत्कार त्यांनी बी जे मेडिकलच्या मैदानावर केला होता ! मनात कायमच सापाची दरदरून भीती असल्याने मी त्यांचा तो धाडसी उद्योग बघायला गेलो होतो ! साप दिसला की आता फक्त खैरे खैरे म्हणतो की झाले !

तुम्हाला एक गंमत सांगतो. माझ्या बालपणी माझे वडील, त्यांचे भाऊ वगैरे सगळे एकत्र राहात. माझ्या आईला काका वहिनी म्हणत. बाल मीला ते म्हणता येत नसल्याने मी तिला उन्नी म्हणू लागलो. पुढे काही वर्षांनी मला वाटले की सगळे आपापल्या आईला आई म्हणतात तर आपणही आई म्हणायला सुरुवात करावी. ते कदापि जमले नाही. ती शेवटपर्यंत उन्नीच राहिली ! त्याचप्रमाणे, बायकोला नावाने हाक मारणे याची सुरुवातच झाली नाही. ती अजूनही अमूर्तच राहिलेली आहे !

गायक नूतन गंधर्व म्हणजेच कै. अप्पासाहेब देशपांडे हे माझे काका होते.

जबरदस्त अर्थांचा अहिंसक धबधबा ! ( श्रीधर तिळवे यांच्या एका कवितेबद्दल. )

पक्की मते बाळगत काळाबरोबर राहणे आणि बदलते वास्तव समजणे म्हणजे काय, हे कुणालातरी स्पष्ट करता येईल का, खुद्द नेमाड्यांसह ?

चित्र पाहून सुचेल-जाणवेल ते लिहितोय --
मुळात जुनेपणाचा फील आहे. त्यातला गुलाबी जरा म्हणजे तसा बराच उत्साह दाखवतोय. जुनकट हिरवा हा शेवाळ्यासारखा दिसतोय. हा उत्साही प्रयत्न घसरत राहणार आहे. एका बाजूला किरकोळ फळे दिसताहेत. दुसरीकडे तशीच फळे आकारही हरवून बसलेली आहेत. एखाद्या पडक्या जुन्या इमारतीच्या पार्श्वभूमीवरचे हे जगणे. हा आनंद की दुःख की नुसतेच रूटीन ? हे सगळे न गुंतता बिनदिक्कत बाहेरून पाहिलेले --
Jayant B. Joshi
Champra Deshpande
धन्यवाद सर. आकार, विनाकारण बदलणारे, एका अलिप्त परिघात योगायोगानी एकत्र आलेत, परत दूर जाण्यासाठी, निरुद्देश, दिशाहीन, अनंतात...

तो प्रयोग तर उत्तमच होत असे, पण, तू केलेले त्या नाटकाचे कल्पक नेपथ्य अजून माझ्या लक्षात आहे !
( ' एक गगनभेदी किंचाळी ' या माझ्या नाटकाचे प्रसन्न जी. कुलकर्णी यांनी केलेले नेपथ्य. )

" मी तंबाखू ( मनानेही ) इतकी सोडलीय की ती मी मधून मधून खातोसुद्धा ! "

Comments
22 August 2020
Today

Champra Deshpande commented on Rahul Bansode's photo.

'मी हिंदूत्ववादी कम्युनिस्ट आहेय आणिक गणेशचतुर्थी निमीत्त अकरा भाज्यांचे ओणम-अवियल खातो.'
तर हनुमानस्तोत्र म्हणता म्हणता
सर्व कम्युनिस्ट अस्तित्ववादी झाले
-- माझ्या ' भाषा ' या कवितेतून.

कला वास्तववादी असो की अतिवास्तववादी असो की अ-कला असो, ती मूल्यात्मक असू शकतेच. बाकीची जी तुझी मांडणी आहे त्यावर माझा अभ्यास वा विचार नाही -- त्यामुळे, आऊटसाईड द ऑफ स्टंप ! छोड दिया !

Champra Deshpande replied to Sachin C. Ketkar's comment.

'सत्य ' वास्तव असे काही नसते. वास्तव म्हणजे मनाच्या कंडिशनिंगमधून येणारी प्रतिक्रिया. त्यामुळे, सर्वांसाठी एकच वास्तव असे काही असू शकत नाही. बरीच कला ही फक्त प्रतिक्रियेच्या क्षेत्रातच वावरताना दिसते. इथे मूल्याचा प्रश्न येतो.

Champra Deshpande replied to Vasant Dahake's comment.

धन्यवाद, सर, सविस्तर कॉमेंटबद्दल. वास्तव म्हणजे ज्याचेत्याचे वास्तव -- उदाहरणार्थ, एका ठिकाणी मी असे मत मांडले होते की ' समकालीन वास्तव ' असे काही नसते -- एकाच काळात हजारो वास्तवे असतात. अमूर्त चित्रकला वा अमूर्त कविता यांच्या मौलिक शक्यतांवरही मी पूर्वी लिहिलेले आहे. तरीही, कलेबाबतचे मूल्यात्मक प्रश्न, तुम्ही म्हणता तसे शेकडो वर्षे चिंतनात राहात आलेले आहेत आणि राहणार. आपसांत हा विषय जरा ढवळला जावा यासाठी ही पोस्ट आहे. आपण चित्रकलेची भाषा, मोडतोड यांवर काही लिहिले आहे -- आशयदृष्ट्या त्यातून मौल्यवान काय घडते याकडे या चर्चेचा रोख आहे. मौल्यवान याचा अर्थ अर्थातच मानवी जगण्याच्या संदर्भात महत्त्वाचे ठरणारे. मी अर्थात या प्रश्नांची उत्तरे माझ्या थोड्याफार वाचनातून आणि स्वतःच्या चिंतनातूनच शोधत असतो. लोक तांत्रिक खूप बोलतात पण आशयाची मौलिकता म्हणजे काय यावर फारसे बोलत नाहीत, असे मला अनेकदा दिसते.

Champra Deshpande replied to Satish Tambe's comment.

माझा टार्गेट वाचक हा कवितेचा सर्वच वाचक आहे -- पण, हे झाले माझे वाटणे ! विभागणी तर खूपच दिसते -- त्यामुळे, सुस्थळी की कुठे का असे ना, पडेल तिकडे पडेल, असे म्हणून निश्चित राहावे, हेच बरे !

Champra Deshpande replied to Manoj Pathak's comment.

फोन -- ९३७१००५७७३.
ईमेल -- champrade@gmail.com

Champra Deshpande replied to Ganesh Kanate's comment.

धन्यवाद !

Champra Deshpande replied to Ratnakar Mahajan's comment.

बौद्धिक, वैचारिक अस्तित्वात गुरफटलेले असणे -- स्वतःच्या अभेद्य कंडिशनिंगमध्ये --

Champra Deshpande replied to Girish Patke's comment.

धन्यवाद गिरीश, सविस्तर कॉमेंटबद्दल !

मग संपलीच इथे चर्चा -- बाकीचे आता पुढल्या जन्मात !□

Champra Deshpande commented on Sachin C. Ketkar's post.

प्रचंड आणि अतिमहत्त्वाचे काम करत आहात ! हे सर्वांच्या आवाक्यातले असो वा नसो, याचे पडसाद सर्वांच्या जगण्यात उमटतात यावर माझा विश्वास आहे !

Champra Deshpande replied to Ramesh Aundhkar's comment.

संबंधाचे भान असणे -- नुसते प्रतिक्रियारूप नसणे --

Champra Deshpande commented on Ravindra Pandhare's post.

समकालीन वास्तव असे काही नसते. लेखकाला दिसेल तेच समकालीन वास्तव म्हणता येईल. कलेत वास्तवाचे महत्त्व नसते -- वास्तवाचे भान येण्याच्या प्रक्रियेचे महत्त्व असते. ती प्रक्रिया वास्तवनिरपेक्ष असते.

Champra Deshpande commented on Uday Narkar's video.

लौकर बरे व्हा --

Champra Deshpande replied to Jui Kulkarni's comment.

Renuka Khot छान, मग चिंताच मिटली !

Champra Deshpande replied to Jui Kulkarni's comment.

सालका शरबत पिओ और खुद जान जाओ --

Champra Deshpande replied to Arun Mirajkar's comment.

आता तुम्हाला चिंताच नाही !

Champra Deshpande replied to Vasant Kelkar's comment.

शब्द कोणतेही वापरा मूल्यात्मकतेत फरक नाही पडत !

Champra Deshpande replied to Sharad Sane's comment.

पण, करवंटी डोंगी परी पोषकता नव्हे डोंगी -- असे होण्याची भीती वाटतेच !

Champra Deshpande replied to Sudheer Pote's comment.

माझी जवानी चालूच आहे -- गेलीय कुठे ?

Champra Deshpande replied to Milind Shintre's comment.

तोंडात ड्रेसिंग करायची पद्धत शिकून घ्यायला हवी !

Champra Deshpande commented on Pradnya Daya Pawar's photo.

आदरणीय सुर्व्यांची कविता अभ्यासायला हा लेख अतिशय उपयुक्त ठरेल ! खूपच उत्कटतेने लिहिलेला मौल्यवान लेख !

Girish Rangnekar's photo.
अभिनंदन !

Champra Deshpande commented on Namdev Koli's post.

पिळवटून आलेले सत्य !

Champra Deshpande commented on Lalit Prabhakar's post.

Ae Mere Des Video Song | Jubin Nautiyal | Lalit Prabhakar | Latest Hindi Song 2019 | T-Series
youtube.com
रिच आणि छान !

August 14

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's photo.

'लवकरच आगामी कविता संग्रह जीवेलागणीच्या कविता वर्णमुद्रा प्रकाशन.'
अभिनंदन !

Champra Deshpande commented on Sunil Tambe's post.

सोशल डिस्टन्सिग पेक्षा ' देहदूरी ' च बेश्ट आहे -- तेच रूढ व्हावे --

August 13

Champra Deshpande replied to Swagat Thorat's comment.

प्रा. एस. आर. देशपांडे.

Champra Deshpande commented on Rahul Bansode's post.

koi hamdam n raha - Google Search
August 12

Champra Deshpande commented on Atul Pethe's photo.

ग्रेटच आहे सोनाली ! एका समूहात ती अर्धा-पाऊण तास बोलली होती, ते अजून माझ्या लक्षात आहे ! तिला हजार शुभेच्छा !

Champra Deshpande replied to Samir Choughule's comment.

अरे ते टायमिंग वगैरे तर आहेच पण मनातून समजून सगळे बारकावे दाखवणे ! अप्रतिम ! टीव्हीवर काही पाहून असे खुश होणे क्वचितच घडते ! खूप शुभेच्छा !

'चांगली समाजरचना करण्यासाठी योग्य तीच साधने वापरणे हे अगदी आवश्यक आहे. अर्थात योग्य साधने म्हणजे हिंसा, द्वेष, महत्त्वाकांक्षा, भीती व अधिकार यांचा स्पर्श न झालेल्या कृती. j.k.'
Commentaries on living -- मध्ये नुक्तीच यावरचीच चर्चा वाचली मी -- ग्रेट !

Champra Deshpande commented on Chandramohan Kulkarni's photo.

'राजहंस' कडून प्रकाशित ! एवढं अडीचशे पानांचं पुस्तक लिहू शकलो मी, पण माजगावकर आणि डॉ. बोरसे ह्या दोघांचे आभार मानायला शब्द सापडत नाहीत ! :-)'
वा ! अभिनंदन !

Champra Deshpande replied to Vishakha Subhedar's comment.

कमाल आहेस तू ! आणि समीरही ! मला मस्त ॲब्सर्ड थियेटरचा आनंद मिळाला ! तुमच्या एकूण टीमला खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on Deepak Borgave's post.

नाटकाचा मूळ आशय असे काही असते का -- हा यातला एक महत्त्वाचा प्रश्न आहे. माझ्या मते मूळ आशय असतो. त्यामुळेच तर प्रेक्षकांच्या मानसिक सवयींना आव्हाने निर्माण होतात. आता कुणी म्हणेल, अनुवादातून अशी वेगळीच आव्हाने निर्माण होऊ शकतील. मूळ आशय समजणे असे काही असूच नसेल शकत तर मग ही एकूण चर्चाच निरर्थक ठरेल.

Champra Deshpande commented on Prachi Pathak's post.

मला खरे तर इतके तपशील समजत नाहीत पण वाचून आल्हाद वाटला ! हे सर्व ' दिसणारी ' एक मैत्रीण आपल्याला आहे हा आणखी एक आल्हाद !

Champra Deshpande commented on Swati Dharmadhikari's post.

Suicide... Causes & Prevention
youtube.com
या विषयाची सर्वांनाच पुरेशी माहिती असायला हवी -- या दृष्टीने खूप महत्त्वाची भाषणे. या काळात तर अधिकच प्रस्तुत ठरावा असा उपक्रम.

Champra Deshpande replied to Rajeev Sane's comment.

होय -- मानवी संबंधांतल्या समस्यांवर बौद्धिक निराकरणे ही अर्धवट आणि कुचकामी ठरतात.

Champra Deshpande commented on Shriram Bhise's photo.

'०३/०८/२०२०.सहजीवनाची चाळीस वर्षे पूर्ण...न'
खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on Waman Kendre's photo.

'!! RANG NAMAN TO NATYA MAHRSHI HON. EBRAHIM ELKAZI SAAB !! PIONEER OF MODERN INDIAN THEATRE MOVEMENT A MULTFACETED LEGENDARY THEATRE PERSONALITY OF INDIA HON. EBRAHIM ELKAZI SAAB PASSED AWAY. A GREAT SALUTE TO HIS UNPARALLELED CONTRIBUTION TO

INDIAN THEATRE & VISUAL ARTS. MAY HIS SOUL REST IN PEACE. BHAVPURN SHRADDHAANJALI. रंग नमन.□□□□. Prof. Waman Kendre.'
स्मृतीस अभिवादन !

August 3

Champra Deshpande commented on Minakshi Patil's photo.
छान लिहिले आहेत ! प्रा. शंकर वैद्यांचा मी विद्यार्थी. त्यामुळे, आफ्रिका हाऊसच्या त्यांच्या घरी अनेकदा जाणेयेणे झाले होते. विद्यार्थ्यांच्या एका कार्यक्रमात आकाशवाणीवर कविता वाचण्याची संधी मला सरोजिनीबाईंमुळेच मिळाली होती ! दोघाही पतिपत्नींनी माझ्यावर आईवडिलांप्रमाणेच प्रेम केले !

Champra Deshpande replied to Arun Naik's comment.

राज कुमार के बेस्ट सीन्स - Raaj Kumar - Best Scenes Compilation - Jukebox
youtube.com
Arun Naik माझी माहिती पूर्ण केल्याबद्दल धन्यवाद !

Champra Deshpande replied to Arun Naik's comment.

राज कुमार के बेस्ट सीन्स - Raaj Kumar - Best Scenes Compilation - Jukebox
youtube.com
होय, पाटणकर विद्यापीठात होते, हे माहीत आहे -- बाकीचे कधी कुठे होते ते माहीत नाही --

१९६३ ते १९६७.

Champra Deshpande commented on राजन अपरंपार's photo.

'जवळ जवळ एक वर्षभर लिहीत असलेली कादंबरी आज, आता लिहून पूर्ण झाली. खुद्द आणि पाऊस. पूर्वी कधीच लिहिलं नाही असं काही तरी लिहून झालंय, तीन भागांत. खरं आणि काल्पनिक. वास्तव आणि अवास्तव. आणि बाहेर मध्यंतरी थांबलेला पाऊसही सुरू झालाय. सुखद आवाज येतोय त्याचा आणि सुखद थकवाही आलाय.'
काल्पनिक, वास्तव आणि अवास्तव यांचा एकत्र काढा हवाच आहे मराठीला -- वास्तववाद म्हणजेच काही खरे या भ्रमातून बाहेर पडण्यासाठी !

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's photo.

Ravindra Damodar Lakhe's photo.
हिंमत है तो नीचे आ बख्तावरसिंग -- मै आ गया हूँ --

Champra Deshpande replied to Amit Shinde's comment.

होय -- त्या एकांकिकेत संवाद आणि कृती यांत अंतर असण्याचेच तंत्र आहे ! आठवणीमुळे आनंद वाटला !

Champra Deshpande commented on Deepali Kulkarni's post.

Deepali Kulkarni: A pat from The Legend! Happiest moment of my life ❤️
Deepali Kulkarni's photo.
धन्यवाद, दीपाली !

Rajendra Mantri's photo.
भारी !

Champra Deshpande commented on Uma Joshi-Bodas's photo.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on Swati Dharmadhikari's photo.

खूप आनंद ! अभिनंदन आणि शुभेच्छा !

Champra Deshpande commented on संभाजी सावंत's photo.

'थोर नाट्यशिक्षक डॉ. कृ. रा. सावंत ह्यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. उद्या सकाळी 8ः30 - ९:०० वा. साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व), येथे त्यांचे अंत्यदर्शन घेता येईल.'
स्मृतीस अभिवादन !

July 2020
July 31

Champra Deshpande replied to Awdhoot Parelkar's comment.

प्रश्न काल्पनिक आणि खोटा आहे -- त्याची चर्चा व्यर्थ होईल -- कारण प्रत्यक्ष ते आपण ' पाहिलेले ' नाही --

July 30

Champra Deshpande commented on Leena Pandhare's photo.

राजेश खन्नाच्या निमित्ताने जीवनभाष्यच !

Champra Deshpande commented on Sanjay Bhaskar Joshi's photo.

यह बॅग ऑपेरा हाऊसके सामने बाबूशेठको देके आना -- कोड 517 ध्यानमे रखना --

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

झोका मंद झुले - छंद ओठांतले - भाग १२ - Kaushal S Inamdar
kaushalsinamdar.in
' गं ' मध्ये मनात खूप असलेला पण बाहेर सौम्यसा व्यक्त होणारा आनंदही छान आलाय ! याला म्हणतात, लाईफ सापडणे !

Champra Deshpande commented on Subodh Pande's photo.

वा ! छानच काढलेय अर्कचित्र !

Champra Deshpande commented on Neha Bhandarkar's photo.

अभिनंदन !

July 27

Champra Deshpande commented on Arun Naik's post.

दुःखद बातमी ! मी विजयच्या भावनांत सहभागी आहे ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

Champra Deshpande commented on his own post.

Janam Janam Ke Phere (1957) Super Hit Classic Movie | जनम जनम के फेरे | B.M. Vyas, Nirupa Roy
youtube.com
https://www.youtube.com/watch?v=FQKL6Hq5hCw

एक गंमत म्हणून ऐका --

Champra Deshpande commented on Anjali Kedar Karanjkar's post.

रात्रीचे ' बेला के फूल ' आहे का अजून चालू ?

Champra Deshpande replied to Shreya Panchal's comment.

1 Year Ago
वा ! तू चांगले केलेस ते काम !

Champra Deshpande replied to Vidyasagar Adhyapak's comment.

मस्त ! छान वाटले ! तालमीला जागा मिळावी म्हणून शिक्षण मंडळाच्या बाकड्यावर बसून आपण तासंतास घालवलेले दिवस आठवले ! ' समतोल ', ' धागेदोरे ', ' ट्रेलर ' यांचे आहेत का फोटो ?

Champra Deshpande replied to Varshha Mahajan's comment.

माझे हल्ली मिडास राजासारखे झालेय -- बोलेन त्याची कविता होतेय !□

Champra Deshpande commented on Ratnakar Mahajan's post.

Ratnakar's most commented photo on Facebook of 2015
त्या दोघांना आणि तुम्हा सर्व कुटुंबियांना खूप शुभेच्छा !

July 25

Champra Deshpande replied to Shri Keskar's comment.

पेडोमीटर -- गुगल प्ले वर मिळते --

डॉ. मनोज भिसे माझे चांगले मित्र होते.

Champra Deshpande replied to Nisarg Deshmukh's comment.

तसे तर जगणेच फालतू असते ! त्यात नवीन काही असू शकते का हा शोध कलेतून घेतला जात राहणे हे अमर्याद असते ! मानवी संबंधांतले विज्ञानाला शून्य कळते ! मानवी संबंधांकडे ' पाहणे ' हे विज्ञानाहून काही क्षुद्र असते असे ज्याला वाटते त्याने तसे जगावे --

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

चहूबाजूंनी उच्चारले गेलेले सत्य !

Champra Deshpande replied to Ashutosh Diwan's comment.

जळणेबिळणे फालतू शब्द नकोत -- प्रत्यक्ष घडलेले दिलेय -- तुमच्या मनाला त्रास झाला की तुमची भाषा लेव्हल सोडते -- आपण एकमेकांच्या फंदात न पडणे बरे -- ( गोपूंच्या ' उध्वस्त धर्मशाळा ' वरही माझे वाईट मत आहे -- हेही जळणे ? मी कारणे देऊन मत मांडलेले आहे. आपण इथल्या चर्चांच्या बाबतीत तरी निरोप घेणे बरे -- रामराम ! )

July 24

म. फुल्यांचे ' तृतीय रत्न ' हे नाटक १८५५ चे आहे.

विष्णुदास भाव्यांचे -- सीतास्वयंवर.

Charudatt Pande's photo.
स्वातंत्र्य आणि कौशल्य यांचा चिंतनगर्भ रंगविलास !

Champra Deshpande replied to Ashok Naigaonkar's comment.

संकेतस्थळावर ते मूळ नावानेच आहे -- ' दिनकर पुरुहितचा खून ' --

अरे वा ! या माहितीने खूप छान वाटले !

Champra Deshpande replied to Vivek Deshpande's comment.

वा ! धन्यवाद !

Champra Deshpande replied to Vivek Deshpande's comment.

या निमित्ताने काही. कै. प्रा. अरुण पाटलांकडे मी दोन वेळा निव्वळ गप्पाटप्पा आणि मौजमजा यासाठी सांगलीला गेलो होतो. अरुणने जयसिंगपूरमधून बसवलेले माझे ' एक गगनभेदी किंचाळी ' हे नाटक राज्य अनागरी नाट्यस्पर्धेत अंतिमला

पहिले आले होते. अरुणकडेच एकदा आदरणीय म. द. हातकणंगलेकर सरांशीही गप्पा मारण्याचा अलभ्य लाभ झाला ! त्यांतल्याच एका भेटीत संजय पाटलांना मी सांगलीत आल्याचे कळले. ते तेव्हा सांगली आकाशवाणीवर होते. त्यांचा निरोप आला की ' उद्या पाटील सर चंप्रंची मुलाखत घेतील, ती रेकॉर्ड करू ' ! हो नाही चा प्रश्नच नव्हता, मित्राची आज्ञाच ती ! आम्ही थोडक्या वेळात काही तयारी केली आणि आकाशवाणीवर जाऊन ते रेकॉर्डिंग केले ! तिथेच, मला वाटते, पाटलांच्या एका सहकाऱ्याकडून मला राम पटवर्धन ( सत्यकथेचे संपादक ) यांचा ठाण्यातला पत्ता मिळाला आणि नंतर मी तिकडे जाऊन त्यांना भेटूनही आलो ! सारांश, संजय पाटील झिंदाबाद !

अत्युत्तम प्रयोग होता तो ! (सांगलीचा ).

Champra Deshpande replied to Vivek Deshpande's comment.

अरे ग्रेट ! तुमचा कर्नल अजून लक्षात आहे ! संजय पाटलांचे अत्युत्तम दिग्दर्शन ! तुमच्या वास्तुकलेच्या पोस्ट मी पाहात असतो !

Champra Deshpande replied to Sanjay Pethe's comment.

हे बरे केलेस --

Champra Deshpande replied to Hemant Karnik's comment.

त्यात उदय म्हैसकर होता. विनायकने बसवलेल्या ' समुदाय ' या माझ्या एकांकिकेत सुहासने काम केले होते. मी नोकरीनिमित्त बाहेरगावी असल्याने मला ते पाहता आले नाही. पण सुहासने माझ्या एकांकिकेत काम केले होते हा माझा अभिमानच आहे !

July 22

Champra Deshpande commented on Prashant Tapasvi's photo.

Prashant Tapasvi's photo.
आमचे प्रिय नाट्यतपस्वी ! खूप शुभेच्छा, प्रशांत !

Champra Deshpande replied to his own comment.

अगदी जरूर या -- खूप गप्पा मारू ! अनेक लोकांचे जगणे मार्गावर आणणारे असे आहात तुम्ही ! तुमच्यासारखा मित्र असणे हे खासच !

होय -- धन्यवाद !

Champra Deshpande commented on Shriram Bhise's photo.

Shriram Bhise's photo.
रामभाऊ म्हणजे माझ्या नाटकातले वाटवे ! खूप बदललाय चेहरा ! असेच कुठे दिसला असतात तर ओळखले नसते ! पण, आपला तो उत्फुल्ल काळ आठवला ! आणि तुमच्या वाड्यातले ते छान गेलेले वास्तव्य ! खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

ऍब्सर्डिटीचे मंगल स्तोत्र !

Champra Deshpande commented on Shalaka Wakankar's post.

तुला आणि तुम्हा सर्वांना खूप शुभेच्छा !

July 21

Champra Deshpande commented on Jugalkishor Oza's video.

Jugalkishor and Champra are celebrating 6 years of friendship on Facebook!
बरीच वर्षे झाली भेटून --

Champra Deshpande commented on Leena Pandhare's photo.

बाप रे ! अद्वितीय जिद्द आणि धाडस !

Champra Deshpande commented on मनीषा कुलकर्णी's post.

अभिनंदन !

Champra Deshpande replied to Jalindar Kumbhar's comment.

आणि थियेटर्स सुरू झाली तरी निम्म्याहून कमी प्रेक्षकांनाच परवानगी मिळेल, असे दिसते. तुम्ही म्हणताय हा मार्ग खरेच विकसित व्हावा.

Champra Deshpande replied to his own comment.

' बहुजन हिताय ' वगैरे कशी घोषवाक्ये असतात ना, तसे देशपांड्यांचेही एक असते -- मास्तरकीतून आलेले असल्याने लोकांना शिकवणे हे यांचे कामच असते. " ( आम्हाला काही येत असो वा नसो, ) लोकांना शिकवण्याच्या कर्तव्यात आम्ही कसूर करणार नाही. " -- हे ते घोषवाक्य ! व्यावसायिकमध्ये, जे मान्यताप्राप्त आहे तेच आणि तेवढेच शिकवता येते, पण, आपण तर दोन पावले पुढचे शिकवणारे आहोत, त्यामुळे, प्रायोगिक साईडच हवी ! -- हाही सुप्त विचार असणार !

लक्ष्मणराव देशपांडे --

वसंतराव आणि राहुल देशपांडे --

Champra Deshpande replied to his own comment.

हे लोक बरेचसे शिक्षण क्षेत्राशी संबंधित राहात आलेले आहेत -- त्यामुळे, व्यवसाय हे आपले कामच नव्हे, असे डोक्यात फिट बसलेले असावे -- मग, पकडा प्रायोगिक, असे झाले असावे ! शिवाय, आम्ही रूटीन व्यावसायिक असूच कसे -- आम्ही स्पेशल आहोत, असा भ्रमही डोक्यात फिट असणार ! त्यातून माझ्यासारखे काही खरेच स्पेशल निघाले किंवा तो भ्रम पक्का करू शकले, हा अपघाती मामला असावा ! नाटक तर हवेय पण सेफ खेळलेले बरे, असा एक मध्यमवर्गीय डावही असू शकेल !

Champra Deshpande commented on Satish Tambe's post.

इंटरेस्टिंग होईल ही नामचिकित्सा !

July 19

Champra Deshpande commented on Shabdalaya Prakashan's photo.

'20 जुलै, ज्येष्ठ लेखक श्री. रंगनाथ पठारे यांचा जन्मदिवस! शब्दालय परिवाराच्या वतीने सरांना मनापासून सदिच्छा!शुभेच्छा!'
खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on Balkrishna Kawathekar's post.

एखादा ओळखीचा माणूस भेटला आणि तो अगदी शांतपणे चाललेला असला तरीही " काय गडबड ? " असेही विचारायची तिथे पद्धत होती ! आता सगळे गडबडीतच असतात त्यामुळे त्यातली गंमत गेली असावी !

Champra Deshpande commented on Hari Narke's photo.

'टेल्कोत रात्रपाळीची वेल्डरची नोकरी करून अण्णासाहेब मगर महाविद्यालयातून मी रेग्युलर बी.ए. केलं. पुणे विद्यापीठात पहिला आलो. तेव्हा राज्यपाल न्या. एस. के. देसाई यांच्या हस्ते सुवर्णपदक आणि २५ पुरस्कार स्विकारताना- (१६/१०/१९८७)'

ग्रेट ! हडपसरचे ना महाविद्यालय ? मला एकदा त्यांनी बोलावले होते -- ' मराठी नाटक ' या विषयावर तीन तास बोलल़ो होतो --

Champra Deshpande commented on Sharmila Phadke's post.

'Warali Painting Unknown painter'

Sharmila Phadke's photo.
'A Dancer In the Rain_ Rabindranath Tagore.'

'Arrival of Tutur in Rain (Jeevan Smriti) Gaganendranath Tagore.'
कधी सुबक सुटसुटीत तर कधी धुवांधार ! छानच !

July 14

Champra Deshpande commented on Sureshkumar Vairalkar's photo.

खूप शुभेच्छा !

16 JUL 20.
Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

माणसांची डोकी आतून फुटलेली आहेत -- मने विदीर्ण आहेत -- जगणे संघर्षमय, हिंसक आहे -- हे सगळ्यांनाच त्रासदायक आहे -- तरीही, हे असे का आहे, हा ठरतो आध्यात्मिक प्रश्न आणि बुद्धिमान लोक लगेच त्याची टवाळी करायला सरसावतात ! टवाळी करणे म्हणजे श्रेष्ठ जगणे असा भ्रम आत्मसात करण्याकडे कल आहे -- कलावंतही याला अपवाद नाहीत !

Champra Deshpande commented on Pradnya Daya Pawar's photo.

खूप शुभेच्छा !

July 13

Champra Deshpande replied to his own comment.

Sachin C. Ketkar Thanks !

Champra Deshpande commented on Sachin C. Ketkar's post.

For bringing home this point only I have been giving translations of some good world-poems in marathi. Sharing this post.

Champra Deshpande replied to Nitin Chavan's comment.

तेही कवितेतूनच म्हटले गेलेय आणि मी लिहितोच आहे कविता -- त्यावरून त्या कवितेचा रोख लक्षात यावा --

July 12

Champra Deshpande commented on Sukhada Korde's photo.

चि. मानसला आणि तुम्हा सर्व कुटुंबियांना खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच, चंद्रपूर's live video.

जगणे आणि कविता या दोन्हींतल्या गांभीर्याचा एकत्र प्रवास समोर आला ! हे घडणे महत्त्वाचे आहे !

Champra Deshpande replied to his own comment.

"'अप्रगल्भ समीक्षका'चे कवितावाचन शब्दकोशात "दाभण' या शब्दाचा अर्थ "मोठी सुई' आणि "सुई' या शब्दाचा अर्थ "लहान दाभण' असा दिला आहे. त्याच धर्तीवर गमतीने असे म्हणावेसे वाटते की "समीक्षक' म्हणजे "प्रगल्भ आणि प्रशिक्षित वाचक' आणि "वाचक' म्हणजे "अप्रगल्भ आणि अप्रशिक्षित समीक्षक.' कारण वाचकाचे कवितावाचन/रसग्रहण ही देखील गंभीर क्रिया आहे आणि समीक्षकाच्या शास्त्रकाट्यालासुध्दा आस्वादाची जोड अभिप्रेत आहेच. गेल्या दोन भागांत कवितेची निर्मितीप्रक्रिया वाचकाने कशी समजून घ्यायची याबद्दल चर्चा करत आहोत. त्याच अनुषंगाने विचार करत असताना कवितेची संहिता वाचताना त्यात काय बघावे किंवा त्यात वाचकाला काय दिसू शकते, याचाही थोडा विचार केला पाहिजे. कवितेची संहिता वाचताना रसिकाला प्रश्न पडायला हवा की मी या विशिष्ट शब्द समूहाला, या विशिष्ट पद्धतीने लिहिलेल्या रचनेला कविता का म्हणतो; कथा, कादंबरी, लेख इत्यादी का म्हणत नाही? कारण एक शतकापूर्वी पद्यरचनेचे छंद, वृत्त, अलंकार, प्रतिमा, प्रतिक, रुपक, मिथक यांचा वापर करून लिहिलेली रचना हे जे सर्वमान्य स्वरुप होते ते गेल्या शंभर वर्षांत आमुलाग्र बदलून गेले आहे. कर्ता, कर्म आणि क्रियापदाच्या गद्यस्वरुप वापरातूनही काव्यनिर्मिती होऊ शकते. त्या रचनेतही काव्यगुण असू शकतात हे आता कुणी अमान्य करत नाही आणि याची शेकडो उदाहरणे दिली जाऊ शकतात. अगदी कवितेच्या माध्यमातून कथाही सांगितली जाऊ शकते हे अनेक चांगल्या कवींनी त्यांच्या रचनांतून दाखवून

दिले आहे. मराठीतले एक उल्लेखनीय कवी गुरुनाथ धुरी यांच्या काही कविता, हिंदीतील प्रख्यात कवी विष्णु खरे यांच्या काही कविता याची साक्ष देतात. एवढेच नव्हे तर सामान्यतः जिला परंपरेने काव्यभाषा म्हटले जाते तिचा अभाव असलेल्या "अकाव्यात्म' भाषेतही कविता लिहिली जाऊ शकते हे अगदी समकालात कविता लिहिणारे श्रीधर तिळवे, चंद्र देशपांडे, सलील वाघ इत्यादी कवींच्या रचनांतून दाखविले जाऊ शकते. कवितेला विषयांचे तर कुठलेही बंधन नसतेच. ती जशी आत्मशोधाची असते तशीच ती विश्वबोधाचीही असते. ती जशी अत्यंत व्यक्तिगत भावनांची अभिव्यक्ती असते तशीच ती सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटीतांनाही आपल्या कवेत घेते. ती जशी निराश करते तशीच ती क्रांतीचे स्फुल्लिंगही जागृत करते. मग रसिकाला एखादी संहिता वाचत असताना नेमका हे काव्य आहे असा बोध कधी आणि का होतो याबद्दल सजग रसिकाने किंवा वर म्हटल्याप्रमाणे "अप्रगल्भ आणि अप्रशिक्षित समीक्षका'ने विचार करायला हवा, असे वाटते. गेल्या कधी दशकांत याबाबतची सजगता फारच कमी झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे काव्य म्हणजे काय आणि काय म्हणजे काव्य नव्हे याबद्दल प्रचंड गोंधळाची स्तिथी मराठी भाषेच्या सांस्कृतिक पर्यावरणात निर्माण झालेली दिसून येते. प्राचीन काव्यशास्त्रात आचार्य कुंतक यांनी वक्रोक्ती आणि आचार्य आनंदवर्धन यांनी ध्वनी सिद्धांत मांडले. अर्थातच "रसात्मक वाक्य म्हणजे काव्य' ही व्याख्याही आपल्या हाताशी होतीच. ही परंपरा आपण अनेक योग्यायोग्य कारणांसाठी अक्षरशः टाकून दिली. हा मराठी भाषकांच्या हातून घडलेला "गुनाह-ए-अजीम' म्हणजे मोठ्ठा गुन्हा आहे. विसाव्या शतकातील आचार्य काणे, हार्वर्ड विद्यापीठातील संस्कृत विषयाचे प्रोफेसर डॅनियेल इंगॅल्स यांच्यामते तर आचार्य आनंदवर्धन हे काव्यशास्त्राचे किंवा पोएटिक्सचे जगातील सगळ्यात महत्त्वाचे भाष्यकार होते. तसेच आचार्य कुन्तक यांनी मांडलेला वक्रोक्तीचा सिद्धांत तर अनेक पाश्चात्य परंपरेतील महत्त्वाचे समीक्षक आणि सिद्धांतकार मांडताना दिसतात. उदाहरणार्थ सेमियॉटिक्स (चिन्हमीमांसा) चा महत्त्वाचा भाष्यकार, समीक्षक मायकेल रिफातेरी कवितेची व्याख्या करताना त्याच्या "सेमियॉटिक्स ऑफ पोएट्री' या ग्रंथाच्या सुरुवातीलाच असे म्हणतो की poetry expresses concepts and things by indirection. ही मांडणी आचार्य कुन्तकाच्या वक्रोक्ती सिद्धांताच्या जवळ जाणारी आहे. हे सिद्धांत वापरून एखादी रचना कविता आहे किंवा नाही किंवा ते उत्तम काव्य आहे किंवा नाही, हे तपासता येते. परंतु, यासाठी या सैद्धांतिक गोष्टींचे किमान माहितीच्या स्तरावरचे ज्ञान कवीला व रसिकाला दोघांनाही असायलाच हवे. या पार्श्वभूमिवर कविता वाचणाऱ्या रसिकाला काही मुलभूत स्वरुपाचे मानदंड किंवा भालचंद्र नेमाडे ज्यांना प्रमाणकं म्हणतात ती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, असे वाटते. ती खालीलप्रमाणे असू शकतील. 1) वाच्य अर्थाच्या पातळीवर न थांबणारी रचना कविता असते मग ती कर्ता, कर्म, क्रियापदाचे गद्य रचनेचे व्याकरणिक नियम पळून लिहिली गेली असली तरी. 2) ध्वनित किंवा व्यंजित अर्थ उपलब्ध करून देणारी रचना कविता असते. तो अर्थ कितीही स्पष्ट किंवा अस्पष्ट किंवा गूढ असला तरी. 3) आपला विषय व आशय वक्र पद्धतीने (indirection) सांगणारी रचना कविता असते. 4) हिंदीत वाईट कवितेचे लक्षण सांगण्यासाठी एक उत्तम शब्द आहे "सपाटबयानी'. (मराठीत याचा प्रतिशब्द सापडला नाही.) "सपाटबयानी' नसलेली रचना कविता असते. 5) तत्वज्ञान या ज्ञानशाखेतील तर्क या संज्ञेस पात्र होईल अशी अभिव्यक्ती नसलेली परंतु, एक विशिष्ट "काव्यतर्क' असलेली रचना कविता असते. शेवटी आणखी एक गोष्ट अधोरेखित केली पाहिजे ती ही की कविता हा एक रुपबंध असला तरी तो केवळ रुपनिष्ठ नसतो. कवितेच्या रुपनिष्ठ आकलनात संहितेत बाहेरून काहीही येत नाही, संहिता हीच अंतिम ठरते परंतु, कविता ही कला काही निर्वात पोकळीत निर्माण होत नाही. कवितेत वापरलेले शब्द, अलंकार, प्रतिमा, प्रतीकं, रुपकं, मिथकं, आदिबंध हे काहीही स्वयंभू नसतात. त्यांना काहीएक सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय संदर्भ आणि परंपरा असतातच. अगदी निरर्थ भासणाऱ्या शब्दांनाही. म्हणून कवितेचा बोध होत असताना रसिकाने म्हणजेच "अप्रगल्भ आणि अप्रशिक्षित समीक्षकाने' त्या संहितेच्या मागे उभ्या असलेल्या मानवी इतिहासाचा आणि संस्कृतीचा संदर्भ ध्यानात घ्यायला हवा.'

बेश्ट !

July 11

Champra Deshpande commented on Ganesh Kanate's photo.

" पुण्याहून संगमनेरला जायला संध्याकाळी पाचला एशियाड आहे " -- हे वाक्य त्या माहितीपुरतेच मर्यादित असेल तर ती झाली सपाटबयानी, पण, हेच वाक्य कवितेत 'अधिकचे ' काही घेऊन येऊ शकते.

Rajendra Mantri's photo.
कमाल !

Champra Deshpande replied to Sharad Deshpande's comment.

Poetry
Enobles the heart and the eyes,
and unveils the meaning of all things
upon which the heart and the eyes dwell.
It discovers the secret rays of the universe,
and restores to us forgotten paradises.

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

धारदार आणि भेदक !

Champra Deshpande replied to Hemant Karnik's comment.

खरे तर माझीही गाडी या दातांजवळ अडली होती. नेमके काही कळत नव्हते. असू दे सध्या आहे तसे, या विचाराने ते rotten वालेच ठेवले. विचार चालूच होता. मग वाटले, रॉटन हा नुसताच एक बोलताना येणारा अधिक्षेपक शब्द असावा -- ' मेल्या ' किंवा ' रांडंच्या ' असा. हे काही करण्यापूर्वी सशाचे दात हा सर्चच देऊन पाहू या म्हटले. तर तिथे असे कळले की सशाचे दात कायम नखांसारखे वाढत असतात. ते घासून मापात राहण्यासाठी त्याला सतत खात राहावे लागते. ते दात जास्त वाढले तर तब्येतीचा प्रॉब्लेम होतो. हे सर्व लक्षात आल्यावर आता ' खादाड ' हा शब्द घेतलाय. आता तो नीट माहितियुक्तही झाला आणि अधिक्षेपकही. आणि मराठीतही अन्वर्थक. तुम्हा दोघांनाही धन्यवाद.

Champra Deshpande replied to Ashutosh Diwan's comment.

या कविता तुम्हाला समजा इंटेलिजंट शब्दसमुच्चय वाटल्या तर त्याला मी काय करू शकणार ? तुम्हाला नेमके काय म्हणायचे आहे, ते कळले नाही.

Champra Deshpande replied to Hemant Karnik's comment.

याच्या दसपट आवडलेलेही वाचनात येऊन गेलेले आहे -- आवडणे या एकाच कारणासाठी हे अनुवाद केलेले नाहीत.

Champra Deshpande commented on Vidyadhar Joshi's post.

बाकी सगळे चालू देत प्रयोग पण कुणी धोत्र्याचे बी गुणकारी आहे असे म्हणू लागला तर लगेच सावध हो -- ते बी विषारी असते !

Champra Deshpande replied to Shridhar Tilve's comment.

अर्थात मूल्यांमुळेच -- अनुभव, मटेरिअल वेगवेगळे असले तरी मूलभूत समस्यांचे आकलन सर्वांना प्रस्तुत असते -- ती आकलन-प्रक्रिया हेच मूल्य.

July 8

Champra Deshpande commented on Shridhar Tilve's post.

हे खोटे आहे. फार यादी करत न बसता, आजचीच काही नावे सांगायची झाली तर -- राजन खान, सतीश तांबे, श्रीधर तिळवे आणि चं. प्र. देशपांडे यांचे बरेच लेखन जागतिक म्हणावे, असे आहे. अनुवाद न होणे हा एक मोठा प्रश्न आहे. पण, जगण्यातल्या मूलभूत समस्या हाताळणे नक्कीच घडते आहे -- ते कोणत्या वाचकांपर्यंत पोचले वा पोचते, हा वेगळा प्रश्न आहे.

Rajeev Sane आहेत ना -- पण समस्या नीट जगूच देत नाहीत त्यामुळे, काहींना प्रश्न पडतात -- ज्यांना प्रश्न पडत नाहीत त्यांचा प्रश्नच नाही --

Champra Deshpande replied to Rajeev Sane's comment.

तेच तर चालू आहे -- संघर्ष, हिंसा, छळ, दुःख यांचे जगणे --

Champra Deshpande replied to Abhijeet Ranadive's comment.

सत्य हे बौद्धिक असते का, हाच तर प्रश्न आहे -- नीतिमूल्ये वगैरे नंतर -- रसेल म्हणतो, sin is geographical !

Champra Deshpande replied to Nisarg Deshmukh's comment.

थोडक्यात, सगळे तुकडेनवाझ आहेत आणि जगणे म्हणजे ज्याचात्याचा स्वभाव वा पिंड ! -- तेच तर चाललेय !

Champra Deshpande replied to Padmakar Brahme's comment.

दोन्ही समानार्थी नाही -- नेटवर अमूर्ततेबद्दल बरेच आहे -- वाचून पाहावे --

Champra Deshpande replied to Nisarg Deshmukh's comment.

छान ! सर्व बाजूंच्या योग्य प्रमाणातल्या संश्लेषणातून काही समजण्याची शक्यता आहे, असेच तुझे म्हणणे दिसतेय --

Champra Deshpande replied to Girish Patke's comment.

असला बौद्धिक विचका नसलेले --

Champra Deshpande replied to Balkrishna Kawathekar's comment.

त्या दृष्टीने जरूर वाचेन --

Champra Deshpande replied to Rajeev Sane's comment.

ते जगण्याचे आकलन असते -- समर्थनाची गरज नसलेले --

July 7

Champra Deshpande replied to Ratnakar Mahajan's comment.

कोणताही आदर्श माणसाच्या आचरणात नसतो -- हीच तर मूळ ॲब्सर्डिटी आहे ! पण, असो, थांबावे हेच बरे !

Champra Deshpande replied to Sharad Deshpande's comment.

नाही, तत्त्वज्ञानाची गुंतागुंतीची आकलनाची पद्धत मला अपेक्षित नाही -- त्या मार्गाने जायला प्रत्येकाला काही वर्षे लागतील आणि तरीही गोंधळ तसाच राहील ! ' तर्का नाही ठाव । येथे रिघावया वाव ।। ' असे तुकारामाने म्हणणे -- हा मार्ग !

Champra Deshpande replied to Ratnakar Mahajan's comment.

ते ठीक -- ' मी लौकरच अहिंसक होईन ! ' टाईप !

Champra Deshpande replied to Sharad Deshpande's comment.

' तार्किक मर्यादा ओलांडण्याचे सामर्थ्य ' इकडेच तर लक्ष वेधायचेय !

Champra Deshpande replied to Abhijeet Ranadive's comment.

म्हणजे, समान सत्य असे काही नसते ! ( मग, कसला विवेक ? )

Champra Deshpande replied to Ratnakar Mahajan's comment.

असा एकही माणूस नसतो, हे सत्य आहे -- प्रत्येक माणूस आपापल्या प्रोग्रामिंगने जगत असतो --

Champra Deshpande replied to Yusuf Shaikh's comment.

अतार्किकतेचा भाग सामावला की तार्किकता बोंबलणार हो !

Champra Deshpande commented on his own post.

अहो, मग, बुद्धिप्रामाण्यवाद, विवेक, तार्किकता, वैज्ञानिक दृष्टिकोण यांचे काय लोणचे घालायचे का काय ? -- या प्रश्नावर आता बुद्धी चालवावी लागेल !

July 6

Champra Deshpande commented on Datta Patil's photo.
अति-सुंदर !

Champra Deshpande replied to Girish Patke's comment.

मलाही खात्री होती -- असेच काही असणार --

Champra Deshpande replied to समीर दळवी's comment.

धन्यवाद !

Champra Deshpande replied to Girish Patke's comment.

अरुणकडून असे जाणीवपूर्वक होईल, असे मला वाटत नाही -- तो स्वतः एक चांगला कवी म्हणून लोकांना माहीत आहे. तरीही, असे कसे झाले हे अरुणनेच सांगावे, म्हणजे झाले --

Champra Deshpande replied to Anil Shende's comment.

Anil Shende मी स्वतःच त्याला विचारणार आहे --

Champra Deshpande replied to Anil Shende's comment.

Anil Shende मला वाटते, कवितेखाली मी नाव लिहीत नसल्याने ही काही चूक झाली असावी -- तो लोकप्रिय कवी आहे -- असे काही करायची त्याला गरज नाही -- पाहू -- कळेल --

Champra Deshpande replied to Anil Shende's comment.

